# दिव्यागांच्या समस्या आणि कायद्यात्मक तरतुदी

प्रा.डॉ.दिलीप महादू कोने , प्रा.स्वाती प्रभाकर मगदूम, प्रा. सुनिता थोरबोले

## प्रस्तावना

" दिव्यांगत्व असणारी व्यक्ती" म्हणजे दीर्घकालीन शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा संवेदनेचे दिव्यांगत्व असणारी व्यक्ती ज्यामुळे, अडथळ्यांशी संवाद साधताना, समाजात इतरांच्या बरोबरीने पूर्ण आणि प्रभावी सहभाग घेण्यात तीज अडथळा होतो. (टी) "उच्च आधाराची गरज असलेले दिव्यांगत्व असणारी व्यक्ती" याचा अर्थ, कलम 58 च्या उप-कलम (2) च्या मुद्दा (अ) खाली प्रमाणित बेंचमार्क अपंगत्व असलेली व्यक्ती जिला उच्च आधाराची गरज आहे, असा आहे;(यु) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;(व्ही) "खाजगी आस्थापना" म्हणजे कंपनी, फर्म, सहकारी किंवा इतर संस्था, संघ, ट्रस्ट, एजन्सी, संस्था, व्यवस्था, संघटना, कारखाने किंवा शासनाकडून अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट केली जाऊ शकेल अशी इतर आस्थापना, असा आहे;(डब्ल्यू) "सार्वजनिक इमारत" याचा अर्थ, लोकांकडून मोठ्या प्रमाणात वापर किंवा ये-जा असलेली सरकारी किंवा खाजगी इमारत, शैक्षणिक किंवा व्यावसायिक उद्दिष्टांसाठी वापरण्यात येणारी, कामाची जागा, व्यावसायिक क्रिया कलाप, सार्वजनिक उपयोगिता, धार्मिक, सांस्कृतिक, विश्राम किंवा मनोरंजन उपक्रम, वैद्यकीय किंवा आरोग्य सेवा, कायद्याची अंमलबजावणी करविणाऱ्या संस्था, सुधारणावादी किंवा न्यायिक स्वरुपाच्या, रेल्वे स्थानके किंवा प्लॅटफॉर्म्स, रोडवेज, बस स्थानक किंवा टर्मिनस, विमानतळ किंवा जलमार्ग यासाठी वापरल्या जाणाऱ्या इमारतीसह, असा आहे.(एक्स) "सार्वजनिक सुविधा आणि सेवां" मध्ये मुख्यत्त्वे जनतेला दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवांचा समावेश होतो, ज्यात घरे, शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रशिक्षण, रोजगार आणि करिअर प्रगती, खरेदी

किंवा विपणन, धार्मिक, सांस्कृतिक, विश्राम किंवा मनोरंजन, वैद्यकीय, आरोग्य व पुनर्वसन, बँकिंग, वित्त आणि विमा, संपर्क, पोस्टल आणि माहिती, न्याय मिळवणे, सार्वजनिक उपयोगिता, वाहतूक यांचा समावेश आहे; (वाय) "वाजवी सोयी" याचा अर्थ, दिव्यांग व्यक्तींना इतरांच्या बरोबर समानतेचा हक्क उपभोगता येणे किंवा उपयोग करता येणे सुनिश्चित करण्यासाठी एखाद्या विशिष्ट बाबतीत प्रमाणाबाहेर किंवा अनुचितभार न पाडता आवश्यक आणि योग्य फेरबदल आणि दुरुस्ती, असा आहे; (झेड) "नोंदणीकृत संस्था" याचा अर्थ, संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या अधिनियमानुसार योग्य प्रकारे नोंदणीकृत असलेली अपंग व्यक्तींची संघटना किंवा दिव्यांग व्यक्ती संघटन, अपंग व्यक्तींच्या पालकांची संघटना, अपनी व्यक्ती आणि कुटुंबातील सदस्यांची संघटना किंवा स्वैच्छिक किंवा गैर-सरकारी किंवा धर्मादायसंस्था किंवा ट्रस्ट, समाज, किंवा गैर-लाभकारी कंपनी जी सपा व्यक्तींच्या कल्याणासाठी काम करीत आहे, असा आहे; (झेड ए) "पुनर्वसन" यात अपर्ण व्यक्तींना अनुकूल, शारीरिक, संवेदी, बौद्धिक, मानसिक पर्यावरणीय किंवा सामाजिक कार्यातील पातळी प्राप्त व्हावी व राखता यावी या दृष्टीने सक्षम करण्याचा उद्देश असलेली एक प्रक्रिया, निर्दिष्ट आहे; (झेड बी) "विशेष सेवा योजन कार्यालय" याचा अर्थ, माहिती गोळा करण्यासाठी आणि ती पुरविण्यासाठी एकतर नोंदवही ठेवून किंवा अन्यथा पुढील बाबींसाठी शासनाने स्थापन केलेले व शासनाकडून चालविण्यात येणारे कोणते ही कार्यालय किंवा ठिकाण, असा आहे- दिव्यांग व्यक्तींमधून कर्मचारी कामावर घेण्याची इच्छा दिव्याग असणाऱ्या व्यक्ती;दिव्यांगत्व (ii) नोकरी शोधणाऱ्या बेंचमार्क दिव्यांगत्व असलेल्या व्यक्ती; (ii) नोकरी शोधणाऱ्या बेंचमार्क अपंगत्व असलेल्या व्यक्तींची ज्यावर नियुक्ती करता येईल अशी रिक्त पदे;(झेड सी) "निर्दिष्ट दिव्यांगत्व " याचा अर्थ, दिव्यांगत्व जे अनुसूची मध्ये निर्देशित केले आहे, असा आहे;(झेड डी) "वाहतूक प्रणालीं" मध्ये रस्ता परिवहन, रेल्वे वाहतूक,

वायुमार्ग वाहतूक, जल वाहतूक, सुदूर संपर्कते साठी पॅराट्रान्झिट सिस्टिम, रस्ते व मार्गांवरील पायाभूत सुविधा इत्यादींचा समावेश होतो. (झेड इ) "सर्वयोग्य संकल्पन" याचा अर्थ, सर्वलोकांना शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात वापरता येण्याजोगी उत्पादने, सभोवतालची परिस्थिती, कार्यक्रम आणि सेवांचे संकल्पन, असा आहे, आणि ते अनुकूलन किंवा विशेष संकल्पनाच्या गरजे शिवाय, आणि दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींच्या विशिष्ट गटासाठी प्रगत तंत्रज्ञानास हित सहाय्यक साधनांना लागू होईल.

**व्यक्तीस उच्च सहाय्य देण्याबाबत विशेष तरतूदी:**

दिव्यांगत्व

(1) कोणाही लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीला उच्च सहाय्याची आवश्यकता भासत असेल व त्याने वा त्याच्या वतीने एखाद्या व्यक्तीने वा संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांना तशा प्रकारचा अर्ज शासनाला सहाय्य पुरवण्यासाठी विनंती म्हणून सूचित करण्यासाठी दिल्यास--

(2) उपकलम (1) खालील अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या प्राधिकरणाने तो केंद्र शासनाने विहित केलेले सदस्य असणाऱ्या मूल्यांकन समितीकडे संदर्भित करावा.

(3) उपकलम (1) खाली संदर्भित केलेले प्रकरण त्या मूल्यांकन समितीने अशा प्रकारे हाताळावे जशी केंद्र शासनाची शिफारस असेल, आणि त्या अधिकाऱ्याला त्या अपंगत्वाचे स्वरूप आणि उच्च सहाय्याची आवश्यकता प्रमाणित करणारा अहवाल द्यावा.

उपकलम (3) चा अहवाल स्वीकारल्यावर सदर अधिकाऱ्याने अहवालानुसार व संबंधित योजनांचे आणि आदेशांचे अधीन राहून सुयोग्य शासनाच्यावतीने व्यक्तीला तशी मदत देण्यासाठी पाव.

भारतीय संविधान सर्व व्यक्तींना समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि आत्मसन्मान याची हमी देते. तसेच दिव्यांग व्यक्तीसह सर्व

व्यक्तीच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने सक्षम समानाची हमी देते. जागतिक आरोग्य संघटनेनुसार जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १५ टक्के लोकसंख्या कोणत्या ना कोणत्या रुपाने दिव्यांग आहे. तसेच भारताच्या एकूण लोकसंख्येत २.२९ लोकसंख्या दिव्यांग आहे. भारतातील आकडयांची विसंगती फार मोठी आहे. कारण दिव्यांग जनाकरिता जी मानके तयार केली ती प्रत्येक वेळी वेगवेगळी आहेत.

## भारतातील दिव्यांगतेच्या श्रेणी

१९८१ च्या जनगणनेत दिव्यांगतेच्या ३ श्रेणी होत्या, २००१ च्या जनगणनेत ५ प्रकारच्या श्रेणी होत्या, २०११ च्या जनगणनेत ८ प्रकारच्या श्रेणी होत्या. दिव्यांग व्यक्ती हक्क (संशोधन) कायदा २०१६ नुसार दिव्यांग श्रेणींना वाढवून २१ श्रेण्या करण्यात आल्या आहेत. भारतातील दिव्यांग व्यक्तीची प्रत्यक्ष संख्या जनगणनेच्या आकड्यापेक्षा खूप जास्त असून ४ ते ८ कोटी दिव्यांग व्यक्ती भारतात आहेत असा अंदाज मांडला जातो. दिव्यांगजनांना मोठ्या प्रमाणात हिंसाचाराला सामोरे जावे लागते. दिव्यांगजनाच्या मानवी प्रतिष्ठेचा आदर करण्याकरिता त्यांना शक्य तितक्या प्रमाणात स्वयं निर्भर होण्याकरिता त्यांच्या हक्कांचे कायद्यात्मकदृष्ट्या संरक्षण आणि संवर्धन होणे गरजेचे आहे.

## उद्देश

१. दिव्यांगजनांच्या समस्यांचा आढावा घेणे.

२. दिव्यांगाकरिता असलेल्या कायद्यात्मक तरतुदींचा आढावा घेणे.

## अध्ययन पध्दती

दिव्यांगजनांच्या समस्या आणि कायद्यात्मक तरतुदी संबंधित आढावा घेऊन मुख्यत्वे प्रकशित साहित्य तसेच इंटरनेट संकेत स्थळाच्या संदर्भातून प्राप्त झालेल्या माहितीचा आधार घेण्यात

आलेला आहे. संदर्भात साहित्याच्या परिक्षणाच्या आधारे सदर शोध निबंधाची वर्णनात्मक स्वरुपात मांडणी करण्यात आली आहे.

## दिव्यांगतेच्या व्याख्या

१. दिव्यांगता म्हणजे शारीरिक, मानसिक, संज्ञानात्मक किंवा विकासात्मक स्थिती जी एखाद्या व्यक्तीस विशिष्ट कार्य किंवा कृतीमध्ये व्यस्त ठेवण्याची किंवा विशिष्ट दैनंदिन क्रियाकलाप आणि संवादांमध्ये भाग घेण्याची क्षमता मर्यादित करते.

२. एखाद्या व्यक्तीला कृती पार पाडण्यास क्षमतेच्या अभावामुळे वय, लिंग, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांवर आधारावर सर्वसामान्य भूमिकाची पूर्तता करण्यावर त्या व्यक्तीला असलेल्या मर्यादा म्हणजे दिव्यांगत्व होय.

## दिव्यांगजनाच्या समस्या

**१. आत्मसन्मान आणि आत्मविश्वासाचा** अभाव मोठ्या प्रमाणात दिव्यांग व्यक्तींना आपल्या क्षमतेबाबत सांशकता असल्याने दिव्यांग व्यक्ती कुटुंबात, मित्र परिवारात, सामाजिक वातावरणापासून स्वतःला अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करतात. बहुसंख्य दिव्यांग व्यक्तींची चेष्टा-मस्करी केली जाते. दिव्यांगता हा सामाजिक कलंक मानल्याने त्यांच्या मनामध्ये स्वतःविषयी न्यूनगंड वाढीस लागतो.

**२. कौटुंबिक वातावरण** : दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबाच्या नकारात्मक दृष्टिकोनामुळे दिव्यांगजनाना कुटुंबात सर्वसमावेशक वातावरण मिळत नाही. पालक कुटुंबातील इतर सदस्य आणि दिव्यांग व्यक्ती यांना एकसमान वागणूक देत नाही. दिव्यांगव्यक्तीच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे वेळेचा आणि पैशाचा अपव्यय होय. दिव्यांग व्यक्ती कोणत्याही रीतीने उत्पादक नसतो. हा समज कुटुंबाकडून निर्माण केल्या जातो.

**३. आरोग्याचे प्रश्न :** दिव्यांग व्यक्तीकडे दुर्लक्ष केले जाते. ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम पडलेला दिसून येतो. योग्यवेळी औषधोपचार न झाल्याने त्यांचे आरोग्य ढासळते. दिव्यांग व्यक्तीच्या विशेष गरजा विचारात घेऊन त्यांना योग्य सहाय्य साधनांचा पुरवठा केला जात नाही.

**४. शैक्षणिक प्रश्न :** दिव्यांग मुले शाळेबाहेर राहण्याची शक्यता अधिक असते. स्थापत्य आणि पर्यावरणीय अडथळ्यांमुळे दिव्यांग मुलांना घरापासून दूर जाऊन शिक्षण घेणे शक्य होत नाही. बहुसंख्य दिव्यांग व्यक्तींना व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश नाकारला जातो.

५. रोजगाराचा प्रश्न : बहुसंख्य दिव्यांग व्यक्तीमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे, रोजगाराकरिता आवश्यक असणा-या कौशल्याचा अभाव असल्यामुळे दिव्यांग व्यक्तीबाबत रोजगाराचा प्रश्न गंभीर आहे.

## कायद्यात्मक तरतुदी

घटनेच्या भाग चार मधील कलम-४१ नुसार दिव्यांग व्यक्तीला कामाचा, शिक्षणाचा विशिष्ट बाबतीत सार्वजनिक सहाय्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. तसेच घटनेच्या सातव्या अनुसूचितील राज्य सूचितील ९ व्या क्रमांकाचा विषय असा आहे. निःक्षम आणि अरोजगारक्षम व्यक्तीची सहाय्यता म्हणजे या विषयाचे कायदे करण्याचा अधिकार राज्य विधानमंडळांना देण्यात आला आहे.त्याचप्रमाणे राज्यघटनेच्या ११ व्या आणि १२ व्या अनुसूचीमध्ये दिलेल्या अनुक्रमे पंचायत व नगरपालिकांच्या अधिकारांमध्येही दिव्यांग घटकांच्या संबंधित विषय देण्यात आले आहेत.

## वैधानिक तरतुदी

भारतीय पुनर्वसन परिषद कायदा १९९२ : या कायद्यानुसार भारतीय पुनर्वसन परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे. या परिषदे अंतर्गत पुनर्वसन कार्याशी संबंधित व्यावसायिक आणि कर्मचा-यांच्या प्रशिक्षणाचे नियमन व पाहणी करते आणि पुनर्वसनाबरोबरच विशेष शिक्षणाबाबत संशोधनास प्रोत्साहन देते.

**२. निःक्षम व्यक्ती (समान संधी, अधिकार संरक्षण आणि पूर्णसहभाग) कायदा १९९५, सुधारीत २०१६ :** या कायद्यानुसार नि.क्षम म्हणजेच दिव्यांग व्यक्तीचे हक्क स्पष्टपणे सांगण्यात आले आहेत. दिव्यांगाचे प्रकार पूर्वी ७ होते आता सुधारीत कायद्यानुसार २१ पर्यंत वाढविण्यात आले आहेत तसेच दिव्यांग व्यक्तींना सामान्य व्यक्तींसारखे अधिकार उपभोगता यावे यासाठी सरकारवर जबाबदारी टाकण्यात आली आहे. बेंचमार्क दिव्यांग व्यक्ती व उच्च आधाराची आवश्यकता असलेले व्यक्ती यांना उच्च शिक्षण, सरकारी नोकऱ्या, भूमीवाटप, दारिद्य निर्मूलन कार्यक्रम यांमध्ये आरक्षणासारखे अतिरिक्त लाभ देण्याची तरतुद करण्यात आली आहे. तसेच ६ ते १८ वयोगटातील बेंचमार्क दिव्यांग बालकास मोफत शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. **राष्ट्रीय न्यास कायदा १९९९ :** ऑटिझम, सेरेब्रल पार्सी, मानसिक मंदता आणि बहुविकलांगतांनी ग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी या कायद्यानुसार राष्ट्रीय न्यास स्थापन करण्यात आला आहे. या न्यासाचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना स्वतंत्रपणे जगण्यासाठी तसेच यथासंभव समुदायामध्ये जगता येण्यासाठी त्यांना सक्षम व सबल बनविणे तसेच या कायद्यानुसार स्थानिक स्तरीय समितीची मानसिक मंदता आणि बहुविकलांगतांनी ग्रस्त दिव्यांग व्यक्तीसाठी एका न्यायीक पालकाची नेमणूक केली जाते. हा न्यायीक पालक दिव्यांग व्यक्तीच्या व संपत्तीच्या देखरेखीसाठी जबाबदार असतो. तसेच राष्ट्रीय न्यासाची स्थापना दिव्यांग व्यक्तीप्रती दोन मूलभूत कर्तव्य पार पाडण्यासाठी झाली आहे. एक न्यायिक कर्तव्ये तर दुसरे कल्याणात्मक कर्तव्ये होय.

**४. मानसिक आरोग्य कायदा १९८७ :** मानसिकदृष्ट्या आजारी दिव्यांग व्यक्तीच्या उपचारासाठी व सुश्रुषा संदर्भात तरतुदी करण्यात आल्या आहेत. हा कायदा मानसिक आजारी दिव्यांग व्यक्तींचे इस्पितळातील प्रवेश नियंत्रित करतो व अशा दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांचे संरक्षण करतो.

## निष्कर्ष

संविधानिक तरतुदी नुसार राज्याची जबाबदारी आहे. प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सर्व क्षेत्रात समान संधी देणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे. कारण की दिव्यांग व्यक्तींना समान संधी, समान वागणूक दिल्यावरच त्यांचा समाजातील दर्जा उंचावेल आणि तेव्हाच दिव्यांग व्यक्ती स्थाभिमानाने जीवन जगू शकतील. भारतीय संविधान सर्व व्यक्तींना समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि आत्मसन्मान याची हमी देते. दिव्यांग व्यक्तीला बऱ्याच वेळेस कौटुंबिक परिस्थितीमुळे सामाजिक बहिष्काराला सामोरे जावे लागते अशावेळेस त्यांच्या विशेष गरजा ओळखून दिव्यांगजनांसाठी असणाऱ्या सेवा त्यांच्यापर्यंत पोचवण्यासाठी परिणामकारक व सोईचे असे नियामक तंत्र विकसित करणे गरजेचे आहे. दिव्यांग मुलाला शाळेत कोणत्याही प्रकारच्या भेदाला सामोरे न जाण्याच्या दृष्टीने शिक्षण विभागाकडून विद्यार्थी, शिक्षक व शाळाप्रमुख यांना विशेष प्रशिक्षण देऊन जागरुक केले पाहिजे. दिव्यांगजनांना प्रतिष्ठा, आत्मविश्वास व सन्मान मिळवून देण्याचे रोजगार हे उत्तम साधन आहे. त्यामुळे शासनाकडून सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या बाबतीत दिव्यांगजनांना समान संधीची हमी दिली गेली पाहिजे. तसेच दिव्यांगजनांना स्वयंरोजगारासाठी कर्जसुविधा व व्याजाच्या परतफेडीत अनुदान सुविधा समाविष्ट असणाऱ्या योजना किंवा कार्यक्रम कार्यान्वित केले पाहिजेत.प्रत्येक राज्याने दिव्यांगजनाचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने त्यांना क्रीडा, सांस्कृतिक व कला करमणूक

अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर विषयात सहभागी होण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रम व उपक्रम राबविणे गरजेचे आहे.

## संदर्भग्रंथ


१. जाधव, तुकाराम आणि शिरापूरकर महेश (२०१५). मानवी हक्क. पुणे: द युनिक ॲकॅडमी

प्रकाशन.

२. कोळंबे, रंजन (२०१६). भारतीय राज्यघटना आणि प्रशासन, पुणे : भगीरथ प्रकाशन.

3. कोळंबे, रंजन (२०१९). मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार. पुणे: भगीरथ प्रकाशन.

४. तुंगार, वा. ना. (२०१८), अपंगांच्या हक्क विषयीचा कायदा-२०१६. पुणे: मायमिरर

पब्लिशिंग हाऊस प्रा. लि.,पुणे